MHNS240002532017

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १३.०२.२०१७ |
| नोंदणी तारीख | : | १३.०२.२०१७ |
| निकाल तारीख | : | ११.०५.२०२६ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | ०९ ०२ २८ |
| निशाणी | | ६३ |

**सटाणा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**

**ता. सटाणा, जिल्हा– नाशिक.**

(पिठासन अधिकारी – यु.पी. हिंगमिरे)

**नियमीत फौजदारी खटला क्र.५२/२०१७**

प्रथम खबर क्र.१९९/२०१५, पोलीस ठाणे सटाणा

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष/फिर्यादी | **महाराष्ट्र शासन**<br>**मार्फत सहाय्यक पोलीस निरीक्षक,**<br>सटाणा पोलीस स्टेशन, ता.बागलाण. |
| सहा. सरकारी अभियोक्ता | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्री. ए.बी.महाजन. |
| आरोपी | **१. मुहिबपाशा पिता चॉदपाशा मुल्ला,**<br>वय २०, रा. हमिलपुरा बीदर, जि.बिदर, राज्य कर्नाटक.<br>**२. महंमद ताजोउद्दीन महंमद रफिकउद्दीन,**<br>वय २४ वर्ष, रा. रॉयलनगर, जि. बिदर, राज्य कर्नाटक,<br>**३. मेहबुब रायचुर,** |

| | |
|---|---|
| आरोपींतर्फे विधीज्ञ | श्री. एन. ए. डांगरे. |
| घटना तारीख | ११.०८.२०१५. |
| प्रथम खबर तारीख | ११.०८.२०१५. |
| दोषारोप दाखल तारीख | १३.०१.२०१७. |
| आरोपींविरुध्द दोषारोप निश्चित तारीख | ११.१२.२०१८. |
| पुरावा चालु तारीख | १०.०४.२०१९. |
| न्यायनिवाडा राखुन ठेवलेली तारीख | |
| न्यायनिवाडा तारीख | ०६.०५.२०२६. |

## <u>आरोपींची सविस्तर माहिती</u>

| आ.क्र | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्या बाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुहिबपाशा पिता चॉंदपाशा मुल्ला | ३०.१२.२०१५ | १४.०१.२०१६ | भा.द.वि.कलम ४५७, ३८० सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| २. | महंमद ताजोउद्दीन महंमद रफिकउद्दीन | ३०.१२.२०१५ | १४.०१.२०१६ | | | निरंक | निरंक |
| ३. | मेहबुब रायचुर | सी.आर.पी.सी. २९९ प्रमाणे | | | | निरंक | निरंक |

अ– अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| १. | विकी महेश माखीजा | फिर्यादी साक्षीदार |
| २. | अमित मदनलाल अजमेरा | पंच |

| | | |
|---|---|---|
| ३. | स्वप्नील अनिल मोरे | पंच |
| ४. | संदिप संतोष शिंदे | साक्षीदार |
| ५. | बबलु सिताराम सोनवणे | साक्षीदार |
| ६. | देवनाथ रोशन नवले | साक्षीदार |
| ७. | शिशीरकुमार कैलासराव देशमुख | तपासी अधिकारी |

ब– आरोपीतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

क– न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

अभियोगपक्षातर्फे, आरोपीतर्फे व न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले कागदपत्र

अ. अभियोगपक्षातर्फे

| अ.क्र | निशाणी क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | २४ | फिर्यादीवरील स्वाक्षरी |

आरोपीतर्फे

| अ.क्र. | निशाणी क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

न्यायालयातर्फे –

| अ.क्र. | निशाणी क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

मुद्येमाल –

| अ.क्र. | आर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

## न्यायनिर्णय

**(दिनांक ११.०५.२०२६ रोजी घोषीत)**

आरोपींविरुध्द प्रस्तुत खटला भारतीय दंड विधान, १८६० कलम ४५७, ३८० सह कलम ३४ अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढील प्रमाणेः–**

**०२.** फिर्यादी विकी महेश माखीजा याने पोलिस ठाणे सटाणा येथे तक्रार दिली होती की, दि.११.०८.२०१५ रोजी सुमारे ०२.४५ ते ०३.१५ वा.चे दरम्यान आरोपींनी दुकानाचे पाठीमागील लोखंडी शटरला असलेले कुलुप तोडुन शटर उघडुन त्यावाटे दुकानात प्रवेश करुन दुकानातील ड्रावरमधील ठेवलेले रोख रक्कम एकुन रु.३,८०,०००/– किमतीचा माल घरफोडी करुन फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने चोरी करुन नेला.

**०३.** सदर फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, जायखेडा येथे गुन्हा क्रमांक १९९/२०१५ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासा दरम्यान तपासीक अंमलदार यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

०४. त्यानंतर माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द (निशाणी क्र.२०) भारतीय दंड विधान, १८६० कलम ४५७ आणि ३८० सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवला व तो आरोपीला मराठीत वाचून व समजावून सांगितला असता त्यानी त्याचे वरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

०५. अभिलेखावर आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे निवेदन निशाणी ५४ व ५५ वर नोंदविण्यात आले. आरोपींनी असा बचाव घेतला की, माझ्यावर खोटी केस केली आहे.

०६. खालील मुद्दे परामर्श करण्याकरीता माझे समक्ष उपस्थित होतात व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले काय की, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरस्सरनार्थ चोरी करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या बागलाण ब्रँडी शॉपमध्ये रात्रीच्या वेळी घरफोडी करून अनधिकृतरित्या प्रवेश केला ? | **नकारार्थी** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले काय की, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरस्सरनार्थ फिर्यादीच्या बागलाण ब्रँडी शॉपमधून रोख रक्कम रुपये ३,८०,०००/- फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने चोरुन नेले ? | **नकारार्थी** |
| ३. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

०७. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन. ए. डांगरे यांचा युक्तीवाद ऐकला.

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. ०१ ते ०२ करीता** :-

०८. फिर्यादी विकी महेश माखीजा (सा.क्र.०१) याच्या पुराव्यात, फिर्यादी यांनी असे सांगितले की, त्यांचे “बागलाण बॅण्डी हाउस” नावाचे वाईन शॉप ताहाराबाद रोड येथे असून त्याचे लायसन्स त्यांचे वडील महेश माखीजा व आजोबा हरिष माखीजा यांच्या नावे असून लायसन्स क्रमांक एफ.एल.२ सी.एल.३२६ असा आहे. सदर दुकान ते सर्व मिळून चालवित असून दुकानाची वेळ सकाळी ९.०० ते रात्री १०.०० अशी आहे. दुकानावर रतिलाल दगा बच्छाव यांना व्यवस्थापक म्हणून तसेच देवनाथ नवले, प्रसंजित दास, विश्वजीत दास व बबलू सोनवणे यांना कामगार म्हणून नेमलेले आहे. दि.१०.०८.२०१५ रोजी फिर्यादी यांनी दुकानातील रोख रक्कम मोजून गल्यात ठेवली व दुकान बंद करून घरी गेले. दि.११.०८.२०१५ रोजी सकाळी ९.०० वाजता व्यवस्थापक रतिलाल बच्छाव व कामगार प्रसंजित दास यांनी दुकान उघडले असता गल्ला उलटा ठेवलेला व ड्रॉवरच्या चाव्या काउंटरवर पडलेल्या दिसल्या. गल्यातील रोख रक्कम गायब होती तसेच दुकानातील फाईल व चाव्या अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या. सीसीटीव्ही फुटेज तपासले असता रात्री २.४५ वाजता एक अज्ञात इसम पाठीमागील शटर तोडून दुकानात प्रवेश करून गल्यातील रोख रक्कम व नाणी बॅगेत भरून पळून गेल्याचे दिसून आले. चोरी गेलेली रक्कम रुपये ३,८०,०००/- इतकी होती. त्यानंतर फिर्यादी यांनी सटाणा पोलीस स्टेशन येथे अज्ञात इसमाविरुद्ध फिर्याद दिली असे कथन केले आहे.

०९. त्याच्या उलटतपासात त्याने मान्य केले की, सदर घटना त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेली नव्हती, तसेच त्यांच्या दुकानातील सर्व कर्मचाऱ्यांची हजेरीपत्रके जतन करण्यात येत असून, घटनेच्या आदल्या दिवशी पाचही कर्मचारी दुकानात कर्तव्यावर होते हे दर्शविणारे हजेरीपत्रक त्यांनी पोलिसांना दिले नव्हते. तसेच दुकानातील विक्री झालेल्या मालाचे रजिस्टर दररोज जतन करण्यात येत असल्याचे त्यांनी मान्य केले. दि.१०.०८.२०१५ रोजी विक्री झालेल्या मालाचे रजिस्टर दुसऱ्या दिवशी सकाळी जतन केले होते, मात्र त्या दिवशी नेमका कोणता माल किती विकला गेला होता हे त्यांना सांगता आले नाही. तसेच चोरीस गेलेल्या रुपये ३,८०,०००/– रकमेमध्ये रुपये १०००/–, ५००/–, १००/–, ५०/–, २०/– व १०/– च्या किती नोटा होत्या हेही त्यांना सांगता आले नाही. तसेच त्यांना सदर घटनेची माहिती व्यवस्थापक बच्छाव यांनी फोनवरून दिली होती. सीसीटीव्ही फुटेजमध्ये नेमका कोण इसम होता हे स्पष्ट दिसत नसल्याचेही त्यांनी मान्य केले आहे. पोलिसांनी त्यांना फोन करून रुपये १,००,०००/– रोख रक्कम मिळाल्याची माहिती दिली होती व ती रक्कम न्यायालयाच्या आदेशान्वये पोलिसांकडून मिळाल्याचे त्यांनी सांगितले. मात्र ती रक्कम पोलिसांनी कोणाकडून जप्त केली होती हे त्यांना सांगता आले नाही.

१०. पंच अमित मदनलाल अजमेरा (सा.क्र.०२) याच्या पुराव्यात असे आले की, त्याला लिहीता वाचता येत नाही. पोलीसांनी त्याला घटनास्थळाच्या पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलाविले नव्हते. त्यावेळी पोलीसांनी एका कागदावर त्याची सही घेतली होती. इतर दुसरे कोणाचीही सही घेतली नव्हती. तो इंग्रजीमध्ये सही करत असुन त्याने पंचनाम्यावरील त्याची सही ओळखली. परंतु, पंचनाम्यात काम मजकुर लिहीला होता हे त्याला माहीत नसल्याचे कथन केले

आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य न केल्याने त्याला उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आलेत. परंतु त्याच्या साक्षीतुन अभियोगपक्षास सहाय्य होईल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आली नाही. त्यामुळे पंचनामा योग्यरित्या शाबित झाला नाही.

**११.** पंच स्वप्नील अनिल मोरे (सा.क्र.०३) याच्या पुराव्यात असे आले की, दि.३०.१२.२०१५ रोजी पोलीसांनी त्याला सटाणा पोलीस स्टेशनला बोलाविले होते. त्यादिवशी हर्षद मोरे हा त्याच्यासोबत हजर होता. त्यांच्यासमक्ष सहा. पोलीस निरीक्षक वनारे यांनी आरोपीचे शर्ट व पॅण्ट जप्त करुन पंचनामा केला होता. सदर पंचनामा बघुन त्याने त्यावर सही केली होती असे कथन केले आहे. त्याच्या उलटतपासात त्याने मान्य केले की, दि.३०.१२.२०१५ रोजी त्याच्या कामानिमित्त पोलिस स्टेशनला गेला होता, पोलिसांनी त्याला पंचनाम्यासाठी हजर रहा अशी लेखी नोटीस दिली नव्हती, त्याच्यासमक्ष पोलीसांनी कोणकोणत्या वस्तू जप्त केल्या हे त्याला सविस्तर सांगता येणार नाही.

**१२.** संदिप संतोष शिंदे (सा.क्र.०४) याच्या पुराव्यात असे आले की, दि.०४.०१.२०१६ रोजी तो पोलीसांसोबत कर्नाटक राज्यातील बीदर येथे गेला होता. त्यावेळी आरोपी क्र.१ व २ हेही पोलीसांसोबत हजर होते. तो पोलीसांसोबत चालक म्हणून गेला होता. बीदर येथे पोलीसांनी त्यास पंच म्हणून उपस्थित राहण्यास सांगितले. त्यानंतर पोलीसांनी आरोपींच्या घरी त्यांच्या समक्ष पैशांची छाननी केली. आरोपींच्या आई–वडिलांनी त्यांच्या समक्ष पोलीसांना रुपये १,००,०००/– दिले. सदर रक्कम पोलीसांनी त्यांच्या समक्ष जप्त करून पंचनामा केला. जप्त करण्यात आलेल्या रकमेमध्ये रुपये १०००/–, ५००/– व १००/– च्या चलनी नोटांचा समावेश होता असे कथन केले आहे.

१३. त्याच्या उलटतपासात त्याने मान्य केले की, पोलीसांनी त्याला पंचनाम्यासाठी हजर राहण्याबाबत कोणतीही लेखी नोटीस दिलेली नव्हती, त्याला पोलीसांनी गाडीवर चालक म्हणून नेले होते, पंचनामा करण्यापूर्वी पोलीसांनी त्याची अंगझडती पंचनामा केलेला नव्हता, ज्या ठिकाणी पंचनामा करण्यात आला त्या ठिकाणाचे नाव व पूर्ण पत्ता त्याला सांगता आला नाही. तसेच जप्त करण्यात आलेल्या रकमेमध्ये अंदाजे ६ ते ७ नोटा रुपये १०००/– च्या, २० ते २५ नोटा रुपये ५००/– च्या व उर्वरित रुपये १००/– च्या नोटा असल्याचे त्याने सांगितले. तसेच पंचनामा त्यांनी स्वतः वाचून पाहिला नव्हता व पंचनाम्यातील मजकूर त्यांना व्यक्तिशः सांगता आला नाही असे मान्य केले आहे.

१४. बबलु सिताराम सोनवणे (सा.क्र.०५) याच्या पुराव्यात असे आले की, सन २०१५ मध्ये तो बागलाण बॅण्डी येथे कामाला होता. दि.११.०८.२०१५ रोजी सकाळी अंदाजे ९.३० वाजता तो दुकानात आला. दुकान उघडल्यानंतर दुकानातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले तसेच काउंटरच्या खाली चिल्लर पडलेली होती. त्यामुळे दुकानात चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी मालक विकी माखिजा यांना फोन करून दुकानातून रुपये ३,८०,०००/– चोरी झाल्याची माहिती दिली. सदर घटनेबाबत मालकाने पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली होती. त्यानंतर पोलीसांनी त्यांची विचारपूस करून त्यांचा जबाब नोंदविला तसेच पुढे त्यांचा पुरवणी जबाबही नोंदविला होता असे कथन केले आहे.

१५. त्याच्या उलटतपासात त्याने मान्य केले की, घटनेच्या आदल्या दिवशी त्यांची तब्येत बरी नसल्याने ते घरी निघून गेले होते, त्यामुळे त्या दिवशी दुकानात किती पैसे आले होते व किती धंदा झाला होता हे त्यांना सांगता आले

नाही. रु.३,८०,०००/- चोरी गेल्याचे मालकाने सांगितले होते, मात्र अशी माहिती त्यांनी जबाब देताना पोलीसांना सांगितली नव्हती. दुसऱ्या दिवशी सकाळी दुकान उघडताना तेथे किती लोक उपस्थित होते तसेच त्यांची नावे काय होती हे त्यांना आठवत नव्हते. त्यांचा जबाब पोलीस स्टेशनमध्ये घेण्यात आला होता, परंतु तो कोणत्या तारखेला घेतला होता हे त्यांना आठवत नव्हते. जबाब घेतल्यानंतर पोलीसांनी त्यांना पुन्हा बोलाविले नव्हते. तसेच घटनेच्या दिवशी दुकानात कोण आले होते व चोरी करून कोण निघून गेले याबाबतची नावे त्यांना सांगता आली नाहीत.

**१६.** देवनाथ रोशन नवले (सा.क्र.०६) याच्या पुराव्यात असे आले की, सन २०१५ मध्ये तो बागलाण ब्रँडी येथे कामाला होता. दि.११.०८.२०१५ रोजी सकाळी अंदाजे ९.०० ते ९.३० वाजताच्या सुमारास तो दुकानात आला. दुकान उघडल्यानंतर दुकानातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले तसेच काउंटरच्या खाली चिल्लर पडलेली होती व ड्रॉवर उघडे होते. त्यामुळे दुकानात चोरी झाल्याचा संशय त्यांना आला. त्यानंतर त्यांनी मालकांना फोन करून दुकानातून रु.३,८०,०००/- चोरी झाल्याची माहिती दिली. सदर घटनेबाबत मालकाने पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली होती. त्यानंतर पोलीसांनी त्यांची विचारपूस करून त्यांचा जबाब नोंदविला तसेच पुढे त्यांचा पुरवणी जबाबही नोंदविला होता असे कथन केले आहे.

**१७.** त्याच्या उलटतपासात त्याने मान्य केले की, घटनेच्या दिवशी त्याच्यासोबत कोण कोण होते हे त्यांना आठवत नव्हते, दुकान उघडल्यानंतर मालकांना फोन कोणी केला होता हेही त्यांना आठवत नव्हते. दुकानात चोरी कोणी केली याबाबत त्यांना माहिती नव्हती. सदर घटना कोणत्या तारखेला

घडली होती तसेच त्या घटनेबाबतचा जबाब कोणत्या तारखेला घेण्यात आला होता हे त्यांना आठवत नव्हते, त्यांचा जबाब पोलीसांनी कुठे घेतला होता हेही त्यांना सांगता आले नाही. तसेच घटनेच्या दिवशी दुकानात कोण आले होते व चोरी करून कोण निघून गेले यांची नावे त्यांना सांगता येणार नाहीत असे मान्य केले आहे.

**१८.** तपासी अधिकारी शिशीरकुमार कैलासराव देशमुख (सा.क्र.०७) यांच्या पुराव्यात असे आले की, सन २०१५ मध्ये ते सटाणा पोलीस स्टेशन येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असतांना सदर गुन्ह्याचा तपास केला होता. तपासादरम्यान त्यांनी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला होता. त्यानंतर त्यांनी सदर दुकानात काम करणाऱ्या नोकरदारांचे जबाब नोंदविले. पुढे त्यांची बदली झाल्याने त्यांनी सदर गुन्ह्याचा तपास सटाणा पोलीस स्टेशन येथे सुपूर्द केला होता असे कथन केले आहे.

**१९.** त्याच्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, पंचनाम्यासाठी त्यांनी पंचांना कोणतीही लेखी नोटीस दिली नव्हती, घटनास्थळाचा ७/१२ उतारा त्यांनी हस्तगत केला नव्हता तसेच ती जागा कोणाच्या मालकीची होती हे त्यांना सांगता आले नाही. त्यांनी दुकानाच्या आजूबाजूच्या लोकांचे जबाब नोंदविले नव्हते. सदर पंचनामा दुपारी १३.०० वाजता सुरू करून १४.०० वाजता समाप्त करण्यात आला होता.

**२०.** एकंदरीत फिर्यादी व साक्षीदारांच्या पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, २१. संपूर्ण अभियोगपक्षाच्या पुराव्याचे परीक्षण केले असता असे दिसून येते की, फिर्यादी विकी महेश माखीजा (सा.क्र.०१) यांनी घटना प्रत्यक्ष पाहिलेली नसून त्यांना सदर घटनेची माहिती व्यवस्थापकाकडून

मिळालेली होती. सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणाऱ्या इसमाची ओळख स्पष्टपणे पटत नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. तसेच चोरीस गेलेल्या कथित रकमेबाबत कोणत्या चलनी नोटा किती प्रमाणात होत्या हेही त्यांना सांगता आले नाही. दुकानातील विक्री रजिस्टर व कर्मचाऱ्यांची हजेरीपत्रके उपलब्ध असूनही ती तपासात सादर करण्यात आलेली नाहीत. विशेष बाब म्हणजे, सीसीटीव्ही फुटेजमधील इसमाची ओळख आरोपींशी जोडणारा कोणताही ठोस पुरावा अभियोगपक्षाने सादर केलेला नाही तसेच आरोपींची ओळख निश्चित करण्यासाठी कोणतीही ओळख परेड घेण्यात आलेली नाही. त्यामुळे आरोपींची ओळख संशयातीतरित्या सिद्ध होत नाही.

२१. घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा सिद्ध करण्यासाठी तपासण्यात आलेले पंच साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्यकारी ठरले नाहीत. पंच अमित अजमेरा (सा.क्र.०२) यांनी पंचनाम्यातील मजकूर माहित नसल्याचे सांगितले असून केवळ सही घेतल्याचे नमूद केले आहे. तसेच पंच संदिप शिंदे (सा.क्र.०४) यांनी पंचनामा स्वतः वाचलेला नसल्याचे व जप्ती झालेल्या ठिकाणाचा पूर्ण पत्ता सांगता येत नसल्याचे मान्य केले आहे. पंचांना कोणतीही लेखी नोटीस देण्यात आलेली नव्हती. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा व कथित जप्तीची विश्वासार्हता संशयास्पद ठरते.

२२. दुकानातील कर्मचारी साक्षीदार बबलु सोनवणे (सा.क्र.०५) व देवनाथ नवले (सा.क्र.०६) यांच्या साक्षीतून केवळ चोरी झाल्यानंतरची परिस्थिती दिसून येते. चोरी कोणी केली याबाबत त्यांना कोणतीही माहिती नव्हती. तपासी अधिकारी यांनीही स्वतंत्र साक्षीदारांचे जबाब नोंदविले नसल्याचे मान्य केले आहे. अशा परिस्थितीत आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरस्सरनार्थ फिर्यादीच्या दुकानात अनाधिकृतपणे प्रवेश करुन रु.३,८०,०००/-

फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने चोरुन नेले ही बाब अभियोगपक्ष सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याने आरोपींना दोषमुक्त करणे आवश्यक ठरते.

**मुद्दा क्र.०३ करीता** :-

**२३.** मुद्दा क्रमांक ०१ व ०२ च्या निष्कर्षावरुन अभियोगपक्ष आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करु शकला नसल्याने आरोपींची निर्दोष मुक्तता करणे न्यायसंगत वाटते. सबब, मी मुद्दा क्रमांक ०३ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

०१. **आरोपी नं.०१ ते ०३** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४५७, ३८० सह कलम ३४ खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

०२. आरोपींचे जामीन मुचलके रद्द करण्यात येतात.

०३. जप्त मुद्देमाल रक्कम रु.१,००,०००/- यापूर्वीच फिर्यादीला न्यायालयीन आदेशाने परत करण्यात आला आहे. सबब, मुद्देमालाचा अंतरीम ताबा अपील कालावधीनंतर कायमस्वरुपी समजण्यात यावा.

०४. इतर जप्त मुद्देमाल एक काळपट रंगाची जिन्स पँट, एक तपकीरी रंगाचा टीशर्ट हे मुल्यरहित असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे त्यांची विल्हेवाट लावण्यात यावी.

०४. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी दिलेले बंधपत्र व जामीनदाराचे

जामीनखत अपील कालावधीपर्यंत ग्राह्य राहिल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

UDAY PRAKASH HINGMIRE

Digitally signed by UDAY PRAKASH HINGMIRE
Date: 2026.05.11 17:47:01 +0530

**दिनांक – ११.०५.२०२६.** **( यु. पी. हिंगमिरे )**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं.२,**

**सटाणा.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer (Grade-III) | : | Pratik S. Kale. |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. |
| Date of Order/Judgment | : | 11.05.2026. |
| Order signed by the Presiding Officer on | : | 11.05.2026. |
| Order uploaded on | : | 11.05.2026. |